
Process Safety Beacon
http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx
उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

CCPS च्या समर्थकांकडून प्रायोजित

मे २०१०

# इमारतींच्या आधारघटकांचे अग्निरोधन




एप्रिल २०१० च्या बीकॉनमध्ये प्रक्रीयेच्या पाइपलाइन्सच्या घटकांचे विशेषत: लांब बोल्ट असलेल्या फ्लॅंजांवरहित व्हाल्व्हचे संरक्षण करण्यासाठी अग्निरोधन करण्याविषयी चर्चा केली. अग्निरोधन हे आगप्रतिबंधक संवेष्टन असते जे सहसा लोखंडाच्या पृष्ठभागावर लावले जाते व आगीच्या संपर्कात आल्यावर लोखंड तापण्याची क्रीया मंदावते. याचा मूलभूत उद्देश इमारतीच्या लोखंडाची अखंडता जोपर्यंत आग एकतर विझत नाही किंवा अन्य अग्निशमन उपकरणे लोखंडाचे उष्णतेपासून पुरेसे संरक्षण करू शकत नाहीत तोपर्यंत अबाधित ठेवण्याची क्षमता देणे हा आहे. वरील डावीकडील छायाचित्रातील पाइप रॅकचे स्तंभ किंवा वरील उजवीकडील छायाचित्रातील आधारस्तंभ यांना जर अग्निरोधन केले नाही तर आगीच्या संपर्कात आल्यावर शीघ्रतेने कमकुवत होऊ शकते व संभवत: काही मिनीटातच कोसळू शकते. पाइपलाइन्स किंवा उपकरणांचे आधारस्तंभ ढासळण्यामुळे पाइपलाइन्स मोडू शकतात किंवा टाक्या ढासळू शकतात ज्यातून ज्वलनशील पदार्थ बाहेर पडून मोठी आग उद्‌भवू शकते.



**← स्टील पाइप ब्रीजच्या स्तंभांच्या अग्निरोधनाच्या झालेल्या नुकसानीची काही उदाहरणे — अग्निरोधन काढले गेले आहे किंवा खराब होऊन पडले आहे.**

## आपण काय करु शकता ?

- आपले काम करीत असताना पाइप ब्रीज, इमारती, संयंत्राच्या बाहेरील प्रक्रीया उपकरणांचे स्ट्रक्चर यांना आधार देणारे स्तंभ आणि तुळया यांच्या अग्निरोधनाच्या हाणाऱ्या हानीवर लक्ष ठेवा.
- दैनंदिन सुरक्षा तपासणीमध्ये अधून अधून अग्निरोधनाच्या तपासणीचा अंतर्भाव करा.
- जर आपल्याला क्षति आढळून आल्यास त्याची सूचना द्या व दुरूस्ती झाल्याची खात्री करा.
- आपण असे काही काम करीत असाल ज्यात इमारतींच्या घटकांचे अग्निरोधन तात्पुरते काढणे आवश्यक असेल तर काम पूर्ण झाल्यावर ते पूर्ववत लावल्याची खात्री करा.
- आपण काम करताना आपल्याकडून इमारतींच्या घटकांचे अग्निरोधन खराब झाले तर त्याची सूचना द्या व दुरूस्ती झाल्याची खात्री करा.
- ध्यानात ठेवा की खराब झालेल्या अग्निरोधनामधून पाणी आत जाऊ शकते व अग्निरोधन अधिक खराब हाऊ शकते आणि अग्निरोधनाखालील स्टील गंजू शकते.

**इमारतींच्या घटकांच्या अग्निरोधनाची काळजी घ्या म्हणजे ते आपली काळजी घेईल!**

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणी पुनर्विक्री करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org or २१२.५९१.७३१९

हे बीकॉन सहसा अफ्रीकन, अरेबिक, चिनी, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, हंगेरियन, इंडोनेशियन, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तमिळ, थाई, तेलगू, तुर्की, उर्दू आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.
This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.